# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक:- २५ मार्च,२०२२

**जळगाव दि.२५ (प्रतिनिधी) : खरी प्रतिभा ग्रामीण किंवा शहरी असा भेद करत नाही. ग्रामीण भागातील व्यक्ती विविध क्षेत्रात पुढे गेले असून अनेक व्यक्ती या उच्च पदावर विराजमान झाल्या आहेत आणि उत्तम असे कार्य करीत आहेत. असे प्रतिपादन अभिनेत्री सुरभी हांडे यांनी केले.**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे 'कवयित्री बहिणाबाई चौधरी' व्याख्यानमाले 'ग्रामीण महाराष्ट्रातील प्रतिभा' या विषयावर सुरभी हांडे बोलत होत्या. त्या म्हणाल्या की, मी सुध्दा ग्रामीण भागातूनच पुढे आली आहे. आपल्याला आपल्या आवडत्या क्षेत्रात पुढे जायचे असेल नाव कमावयाचे असेल व आपल्यात प्रचंड आत्मविश्वास व कष्ट करायची इच्छा असेल तर आपण नक्की यशस्वी होऊ शकतात. कोणतेही न्युनगंड न बाळगता यशस्वी होणेसाठी व आपले व आपल्या परिवाराचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी सतत धडपड व प्रयत्न केले पाहिजेत असे त्या म्हणाल्या. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक प्रा.मनिष जोशी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रा.मनिष जोशी यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना सांगीतले की, विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या माध्यमातून विद्यापीठ परीक्षेत्रातील विविध महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने परीसरातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा, व्यक्तीमत्व विकास व संवाद कौशल्य अशा विविध विषयांवर तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी त्यांच्याशी संबधित असलेल्या विविध विषयांवर कार्यशाळा व कार्यक्रमांचे आयोजन वेळावेळी करण्यात येत असते. या प्रसंगी अनेक विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक व ऑनलाईन उपस्थितांनी व्याख्याता सुरभी हांडे यांना त्यांच्या क्षेत्राविषयी विविध प्रश्न विचारले. प्रास्ताविक सुभाष पवार यांनी केले. सुत्रसंचालन डॉ. पुरूषोत्तम पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय मानसी झोडगेकर यांनी करून दिला. ॲड. लिना म्हस्के हिने आभार मानले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी